जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

25 MAY 2023 तरूण भारत

# विद्यापीठात मत्स्यालयासह जल-जैवविविधता केंद्र साकारणार

## शिवाजी विद्यापीठाचा डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठासोबत सामंजस्य करार

प्रतिनिधी

कोल्हापूर

दापोली (जि.रत्नागिरी) येथील डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठासोबत शिवाजी विद्यापीठाचा अध्यापन, संशोधन व विस्तार कार्यासाठी सामंजस्य करार झाला. या करारान्वये शिवाजी विद्यापीठात मत्स्यालय आणि जल-जैवविविधता केंद्र साकारणार आहे. त्यासाठी कृषी विद्यापीठासह त्यांच्याशी संलग्नित महाविद्यालयांचेही सहकार्य लाभणार आहे.

शिवाजी विद्यापीठ जलसाठ्यांसाठी प्रसिद्ध आहे, शिवाय पाण्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण आहे. पूरस्थितीमध्ये याच पाणवठ्यांमधून संपूर्ण शहरास पाणीपुरवठा करण्याचे कामही विद्यापीठाने केले. या जलस्रोतांमध्ये विविध प्रकारचे मासे, जलचर यांचे संवर्धन करणे, ज्यायोगे तळ्यातील पाणी निसर्गतः स्वच्छ राहील आणि पाण्यामधील अन्नसाखळी समृद्ध होईल. यादृष्टीने डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाशी संलग्नित मत्स्यविज्ञान महाविद्यालय, रत्नागिरी यांचे सहकार्य व मार्गदर्शन विद्यापीठास लाभणार आहे. तसेच शिवाजी विद्यापीठाच्या परिसरात भव्य मत्स्यालय व जल-जैवविविधता केंद्र निर्माण करण्यासाठीही डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ यांच्याकडून तांत्रिक मार्गदर्शन लाभणार आहे. शिवाजी विद्यापीठातर्फे डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ यांच्या संशोधकांना औषधी वनस्पतींचे जैवरासायनिक पृथक्करण, औषधी वनस्पती तसेच जंगलात आढळणाऱ्या पण संख्येने कमी प्रमाणात असणाऱ्या वनस्पतींचे टिश्यू कल्चरद्वारे पुनरूज्जीवन करण्यासाठी सहकार्य व मार्गदर्शन लाभणार आहे. भविष्यात दोन्ही विद्यापीठांच्या सहचर्याने विविध कार्यशाळा, व्याख्याने, चर्चासत्रे यांचे आयोजन केले जाणार आहे.

कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के म्हणाले, कृषी विद्यापीठ व अकृषी विद्यापीठांमध्ये होणारा हा सामंजस्य करार वेगळ्या स्वरुपाचा आहे. दोन्ही विद्यापीठांतील सर्व घटकांच्या संशोधनात्मक व शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी निश्चितपणे उपयुक्त ठरेल. कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजय सावंत म्हणाले, सामंजस्य करारामुळे वन्यविज्ञान महाविद्यालय, दापोली व औषधी वनस्पतींवर संशोधन करणाऱ्या कृषी विद्यापीठातील संशोधकांना शिवाजी विद्यापीठातील समृद्ध उपकरण कक्ष, प्रयोगशाळा व संशोधकांच्या ज्ञानाचा लाभ होईल. डॉ. भिलावे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. मानसिंगराज निंबाळकर यांनी आभार मानले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, प्राणिशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. आशिष देशमुख, डॉ. अधिकराव जाधव ऑफलाईन तर डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. भावे, मत्स्यविज्ञान महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता प्रा. शिंगारे, वनशास्त्र महाविद्यालय दापोलीचे डॉ. अजय राणे आदी ऑनलाईन उपस्थित होते.

2 5 MAY 2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## विविध अभ्यासक्रमांचा समावेश; कोल्हापूर, सांगली, साताऱ्यातील दोन लाख विद्यार्थी

# विद्यापीठाच्या उन्हाळी सत्रातील परीक्षा आजपासून

कोल्हापूर, ता. २४ : शिवाजी विद्यापीठाच्या विविध अभ्यासक्रमांच्या पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या उन्हाळी सत्रातील परीक्षांचा प्रारंभ उद्या (ता. २५)पासून होणार आहे. या सत्रात एकूण ६०० परीक्षा होणार असून, त्यासाठी कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील दोन लाख विद्यार्थ्यांनी नोंदणी केली. जुलैपर्यंत या परीक्षा होणार आहेत.

विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाने उन्हाळी सत्रातील परीक्षा जूनमध्ये घेण्याचे नियोजन केले होते. मात्र, विद्यार्थी, पालकांनी या परीक्षा लवकर घेण्याची मागणी केली. त्याचा विचार करून विद्यापीठाने उद्यापासून घेण्याचे ठरविले. त्यानुसार पहिल्या टप्प्यात बी. ए., बी. कॉम. भाग तीन अभ्यासक्रमांच्या पाच आणि सहा सत्रातील नियमित, पुर्नपरीक्षार्थी विद्यार्थ्यांची परीक्षा होणार आहे. त्यासाठी ३० हजार ८९ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. ऑफलाईन वर्णनात्मक स्वरूपात परीक्षा होणार आहेत. पदविका, पदव्युत्तर पदविका, प्रमाणपत्र अभ्यासक्रमांच्या परीक्षा महाविद्यालय आणि अधिविभागस्तरावर होणार आहेत. महाविद्यालयस्तरावरील परीक्षा १५ ते २५ जून, तर विद्यापीठातील अधिविभागांच्या पातळीवर १ ते १५ जून या कालावधीत परीक्षा होतील. दरम्यान, बीएड सेमिस्टर तीन आणि चार या परीक्षांचे निकाल बुधवारी जाहीर झाले. आतापर्यंत एकूण ५५३ परीक्षांचे निकाल जाहीर झाले आहेत.

### आज विशेष अधिसभा

शिवाजी विद्यापीठाची विशेष अधिसभा (सिनेट) उद्या होणार आहे. राजर्षी शाहू सभागृहात दुपारी बाराला या सभेला सुरुवात होणार आहे. विद्यापीठाचा वार्षिक अहवालातील चुका आणि बृहत् आराखड्यातील बिंदू प्रस्तावाच्या मुद्द्यांवरून या सभेतील वातावरण तापण्याची शक्यता आहे.

दरवर्षी विद्यापीठाचा वार्षिक अहवाल मार्चमधील सिनेटमध्ये सादर केला जातो. त्याला या सभेत मान्यता मिळाल्यानंतर विधिमंडळात सादर करण्यात येतो. मात्र, यावर्षी वार्षिक अहवाल तयार करण्यास विलंब झाला. या अहवालामध्ये काही गंभीर चुका आहेत. त्यावर विद्यापीठाच्या अधिकार मंडळांनी उपसमिती नेमली आहे. अहवालाची छपाई करणाऱ्या मुद्रणालय विभागावर आक्षेप घेतला जात आहे. त्यावर सिनेट सदस्यांकडून विविध प्रश्न उपस्थित होण्याची शक्यता आहे. पुढील पाच वर्षांचा बृहत् आराखडा विद्यापीठाकडून तयार करण्यात येत आहे. त्यात नवीन महाविद्यालयांचे बिंदू प्रस्तावित केले आहेत. मात्र, दोन महाविद्यालयांचे बिंदू रद्द करण्यात आले आहेत. त्यावर वादळी चर्चा होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. दरम्यान, १० मार्चला विद्यापीठाची सिनेट झाली होती. त्यामध्ये ५३८ कोटी रुपयांचे अंदाजपत्रक (बजेट) मंजूर झाले होते.

### महाविद्यालय पातळीवर प्रथम वर्षाच्या परीक्षा

- पदवी स्तरावरील परीक्षा (प्रथम आणि द्वितीय वर्ष सत्र १, २, ३ आणि ४) महाविद्यालय पातळीवर गुरुवार (ता. २५)पासून होणार आहेत. त्यात बी. ए., बी. कॉम., बीसीए. आदी पारंपरिक अभ्यासक्रमांचा समावेश आहे. या अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे वेळापत्रक, प्रश्नपत्रिका तयार करणे, उत्तरपत्रिकांचे मूल्यमापन अशी सर्व परीक्षाविषयक कामाची जबाबदारी महाविद्यालयांवर आहे.



### विद्यापीठाच्या संकेतस्थळावर 'व्हायरस ॲटक'

'व्हायरस ॲटक' झाल्याने आज सायंकाळनंतर सुमारे तीन तास शिवाजी विद्यापीठाचे संकेतस्थळ (वेबसाईट) बंद राहिले. तांत्रिक अडचण दूर करून संकेतस्थळ पूर्ववत सुरू करण्यासाठी रात्री उशिरापर्यंत विद्यापीठाच्या संगणक आणि तांत्रिक विभागातील अधिकारी, कर्मचारी कार्यरत होते.

अभ्यासक्रम, परीक्षांचे वेळापत्रक, विविध शैक्षणिक योजना आदींबाबतची माहिती एका क्लिकवर विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून दिली आहे. पेपरलेस कामकाज करण्याच्या उद्देशाने विद्यापीठाने विविध स्वरूपातील अर्ज, शुल्क भरणे अशा काही सुविधा ऑनलाईन केल्या आहेत. कोल्हापूर, सांगली, सातारा आणि दूरशिक्षण केंद्राच्या माध्यमातून अन्य जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना या संकेतस्थळाचा उपयोग होता. बुधवारी सायंकाळी पाचच्या सुमारास संकेतस्थळावरील इंडेक्स टॅबवर व्हायरस ॲटक झाल्याचे संगणक-तांत्रिक विभागाच्या लक्षात आले. त्यावर या विभागाने तातडीने प्रक्रिया सुरू केली. रात्री उशिरापर्यंत तांत्रिक प्रक्रियेतील स्कॅनिंगची प्रक्रिया सुरू होती. दरम्यान, गुरूवारपासून विद्यापीठाच्या परीक्षा सुरू होणार आहेत. त्या पार्श्वभूमीवर हॉलतिकीट, वेळापत्रक, आदींची खात्री करून घेण्यासाठी काही विद्यार्थ्यांनी संकेतस्थळ उघडण्याचा प्रयत्न केला. मात्र, तांत्रिक अडचण आली.

25 MAY 2023

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रस्ताव तयार : एनसीटीईकडे मंजुरीसाठी पाठवणार

# शिवाजी विद्यापीठात आता बीएस्सी बी.एड अभ्यासक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात बीएस्सी.बी.एड (इंटिग्रेटेड) अभ्यासक्रम सुरू करण्याचा विचार प्रशासन करत असून, तसा प्रस्तावही तयार करण्यात आला आहे. हा प्रस्ताव मंजुरीसाठी एनसीटीईला (नॅशनल काऊन्सिल फॉर टीचिंग एज्युकेशन) पाठविण्याचा ठराव व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत करण्यात आला.

नवीन शैक्षणिक धोरणामुळे अनेक अभ्यासक्रमांमध्ये बदल झाले आहेत. त्यामुळे शिवाजी विद्यापीठानेही याच अनुषंगाने नवे अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. त्याचाच एक भाग म्हणून आता बीएस्सी.बी.एड अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी पावले उचलली आहेत. पूर्वी बी.एड दोन वर्षांचे होते. त्यासाठी त्याला पदवीची अट होती. आता नव्या धोरणानुसार बारावीनंतर थेट बी.एडचा एकच अभ्यासक्रम तयार करण्यात आला असून, तो चार वर्षांचा केला आहे. बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्याला बी.एस्सी.बी.एडला प्रवेश मिळणार आहे. यामुळे विद्यार्थ्यांचे एक वर्ष वाचणार आहे.

## थेट बारावीनंतर प्रवेश, विद्यापीठात ५० जागा

- बीएस्सी.बी.एड अभ्यासक्रमासाठी थेट बारावीनंतर प्रवेश मिळणार आहे. पूर्वी पदवी घेतल्यानंतर दोन वर्षांचा बी.एडचा कोर्स करावा लागत होता.
- त्यामुळे बारावीनंतरची तीन व बी.एडची दोन अशी पाच वर्षे लागायची.
- आता मात्र चार वर्षांतच हा कोर्स पूर्ण होणार आहे. यामुळे एक वर्ष वाचणार आहे.
- विद्यापीठाने तयार केलेल्या नियोजित अभ्यासक्रमात ५० विद्यार्थ्यांची प्रवेश क्षमता असणारा प्रस्ताव तयार केला आहे.

एनसीटीईने या अभ्यासक्रमासाठी प्रस्ताव मागविले होते. त्यानुसार विद्यापीठाने प्रस्ताव तयार केला आहे. नव्या शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने हा अभ्यासक्रम असून, यामुळे विद्यार्थ्यांचे एक वर्ष वाचणार आहे. ३१ मेपूर्वी हा प्रस्ताव एनसीटीईकडे पाठविणार आहोत.

- डॉ. पी. एस. पाटील, प्र. कुलगुरु शिवाजी विद्यापीठ.



## ...तरच मंजुरी

विद्यापीठाने तयार केलेल्या प्रस्तावाची एनसीटीईकडून तपासणी होईल. विद्यार्थ्यांसाठी रोजगाराभिमुख, नवतंत्रज्ञानयुक्त असा अभ्यासक्रम या प्रस्तावात आहे का या अनुषंगाने विचार होऊनच या प्रस्तावाला मंजुरी द्यायची की नाही याचा निर्णय एनसीटीई घेत असते.

लोकमत

# बी. एड. च्या सत्र तीन, चारचा निकाल

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाकडून बी. एड. च्या सत्र तीन व चार या अभ्यासक्रमांचे निकाल बुधवारी (दि. २४) जाहीर करण्यात आले. विद्यापीठाच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर-२०२२ हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या ५६४ अभ्यासक्रमांपैकी ५५३ अभ्यासक्रमांचे निकाल आजअखेर घोषित करण्यात आले आहेत.